# प्रसिध्दी पत्रक

## एखाद्या मोहिमेच्या यशासाठी जोखीम घेणे आवश्यक
## भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे विचार

मुंबई : व्यवसायामध्ये किंवा उपक्रमामध्ये अनेक जोखीम असतात. आपल्याला एखाद्या मोहीमेमध्ये यशस्वी व्हायचे असेल तर जोखीम घेणे आवश्यक आहे. जोखीम घेतल्यानेच यश मिळते. १९७९ साली प्राध्यापक सतिश धवन यांनी ७ वर्षात उपग्रह विकसित करुन अवकाशात सोडण्याची मोठी जोखीम त्यांनी माझ्यावर सोपविली होती. ती मोहीम जोखीम घेतल्यानेच यशस्वी झाली. असे उद्‌गार भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी मुंबई विद्यापीठाच्या आफ्रिकन अध्ययन केंद्राने आयोजित केलेल्या 'आंतरराष्ट्रीय व्यापारातील जोखीम व्यवस्थापन : केंद्रस्थ आफ्रिका' या विषयावर बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. राजन वेळुकर होते.

यांप्रसंगी बोलताना डॉ. कलाम पुढे म्हणाले जगात वेगाने वाढणारी आफ्रिकेची अर्थव्यवस्था असून या देशामध्ये काम करणाऱ्या तरुणांची लोकसंख्या वाढत आहे. भारत तसेच आफ्रिका या देशाला व्यवसायांची संधी हि सारखीच असून भारताचा आफ्रिकन देशाबरोबरचा व्यापार हा मागील दशकांमध्ये वाढत चाललेला आहे. भारताने २०१५ पर्यंत आफ्रिकाबरोबर व्यापाराचे १०० अब्ज डॉलरचे लक्ष्य ठेवले आहे.

याप्रसंगी त्यांनी २०३० मधील जग याबद्यल बोलताना म्हणाले. जगातील विविध देशाची विभागणी शहरी व ग्रामीण, गरीब व श्रीमंत, विकसित व विकसनशील अशी झाली आहे हि दरी कमी होणे आवश्यक आहे. तसेच ऊर्जा व पाणी यांचे समान वाटप झाले पाहिजे.

समाजातील सर्व घटकांना विकासाचा लाभ व आर्थिक संधी मिळाली पाहिजे. तसेच या देशातील विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच मूल्य पद्धतीचेही ज्ञान देणे आवश्यक आहे. तसेच सर्वांना दर्जेदार आरोग्याच्या सुविधा देणेही आवश्यक आहे.

आफ्रिका व भारत या देशाचा द्विपक्षीय व्यापार हा जोखीमविना वातावरणात झाला पाहिजे जेणेकरुन दोन्हीही देशातील द्विपक्षीय संबंध हे जगामध्ये शाश्वत शांतता व सौदार्हता यांचे एक सर्वोत्तम उदाहरण म्हणून दिसले पाहिजे असेही त्यांनी सांगितले. त्यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांच्या अनेक प्रश्नांना उत्तरे दिली.

या कार्यक्रमास मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव कुमार खैरे, आफ्रिकन अध्ययन केंद्राच्या संचालिका प्रा. डॉ. अपराजिता बिश्वास व या कार्यशाळेचे समन्वयक डॉ. मनेंद्र साहू हे उपस्थित होते.

---

पीआरओ/पीआर/ ८०/२०१३. दिनांक :८ मे, २०१३

प्रति,
मा.संपादक / प्रतिनिधी,

महोदय,
कृपया वरील वृत्त आपल्या सुप्रसिध्द दैनिकात प्रसिध्द करावे हि विनंती.

(विनोद माळाळे)
जनसंपर्क अधिकारी
मो.नं.९८६९७९००६६

<u>प्रसिध्दी पत्रक</u>

## एखाद्या मोहिमेच्या यशासाठी जोखीम घेणे आवश्यक
## भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे विचार

मुंबई :व्यवसायामध्ये किंवा उपक्रमामध्ये अनेक जोखीम असतात. आपल्याला एखाद्या मोहीमेमध्ये यशस्वी व्हायचे असेल तर जोखीम घेणे आवश्यक आहे. जोखीम घेतल्यानेच यश मिळते. १९७९ साली प्राध्यापक सतिश धवन यांनी ७ वर्षात उपग्रह विकसित करुन अवकाशात सोडण्याची मोठी जोखीम त्यांनी माझ्यावर सोपविली होती. ती मोहीम जोखीम घेतल्यानेच यशस्वी झाली. असे उद्‌गार भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी मुंबई विद्यापीठाच्या आफ्रिकन अध्ययन केंद्राने आयोजित केलेल्या 'आंतरराष्ट्रीय व्यापारातील जोखीम व्यवस्थापन : केंद्रस्थ आफ्रिका' या विषयावर बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. राजन वेळुकर होते.

यावेळी बोलताना डॉ. कलाम पुढे म्हणाले जगात वेगाने वाढणारी आफ्रिकेची अर्थव्यवस्था असून या देशामध्ये काम करणाऱ्या तरुणांची लोकसंख्या वाढत आहे. भारत तसेच आफ्रिका या देशाला व्यवसायांची संधी हि सारखीच असून भारताचा आफ्रिकन देशाबरोबरचा व्यापार हा मागील दशकांमध्ये वाढत चाललेला आहे. भारताने २०१५ पर्यंत आफ्रिकाबरोबर व्यापाराचे १०० अब्ज डॉलरचे लक्ष्य ठेवले आहे.

याप्रसंगी त्यांनी २०३० मधील जग याबद्यल बोलताना म्हणाले. जगातील विविध देशाची विभागणी शहरी व ग्रामीण, गरीब व श्रीमंत, विकसित व विकसनशील अशी झाली आहे हि दरी कमी होणे आवश्यक आहे. तसेच ऊर्जा व पाणी यांचे समान वाटप झाले पाहिजे.

समाजातील सर्व घटकांना विकासाचा लाभ व आर्थिक संधी मिळाली पाहिजे. तसेच या देशातील विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच मूल्य पद्धतीचेही ज्ञान देणे आवश्यक आहे. तसेच सर्वांना दर्जेदार आरोग्याच्या सुविधा देणेही आवश्यक आहे.

आफ्रिका व भारत या देशाचा द्विपक्षीय व्यापार हा जोखीमविना वातावरणात झाला पाहिजे जेणेकरुन दोन्हीही देशातील द्विपक्षीय संबंध हे जगामध्ये शाश्वत शांतता व सौदार्हता यांचे एक सर्वोत्तम उदाहरण म्हणून दिसले पाहिजे असेही त्यांनी सांगितले. त्यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांच्या अनेक प्रश्नांना उत्तरे दिली.

या कार्यक्रमास मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव कुमार खैरे, आफ्रिकन अध्ययन केंद्राच्या संचालिका प्रा. डॉ. अपराजिता बिश्वास व या कार्यशाळेचे समन्वयक डॉ. मनेंद्र साहू हे उपस्थित होते.

---

पीआरओ/पीआर/ ८०/२०१३. दिनांक :८ मे, २०१३

प्रति,
मा.संपादक / प्रतिनिधी,

महोदय,

कृपया वरील वृत्त आपल्या सुप्रसिध्द दैनिकात प्रसिध्द करावे हि विनंती.

(विनोद माळाळे)
जनसंपर्क अधिकारी
मो.नं.९८६९७९००६६